मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# "आर्टिफिशियल इंटेलिजन्स" आपला स्मार्ट सहकारी

## जुन्या वाहनांच्या लिलावातून पिंपरी-चिंचवड महापालिकेला 59 लाख महसूल

**पिंपरी | प्रतिनिधी**

आर्टिफिशियल इंटेलिजन्स (एआय) तंत्रज्ञानाविषयी सध्या समाजमाध्यमांवर अनेक सकारात्मक आणि नकारात्मक मतप्रवाह दिसत आहेत. मात्र, आता हे तंत्रज्ञान केवळ भविष्यातील कल्पना न राहता, प्रत्यक्ष प्रशासकीय कामकाजाचा एक आवश्यक भाग बनत आहे. हे संकट नव्हे, तर तो आपला स्मार्ट सहकारी आहे. कार्यालयीन कामकाज अधिक जलद, सुलभ आणि अचूक होण्यासाठी प्रत्येकाने तंत्रज्ञानस्नेही होणे ही काळाची गरज आहे. आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या माध्यमातून गुणवत्ता आणि परिणामकारकता निश्चितच वाढवू शकतो. तंत्रज्ञानाबद्दलचे गैरसमज दूर करून, त्याची अचूक समज घेतल्यास ते आपल्याला अधिक सक्षम बनवू शकते, असे मत आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी व्यक्त केले.



राज्य शासनाच्या १०० दिवसीय विशेष उपक्रमांतर्गत पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना 'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सुयोग्य माहिती तंत्रज्ञानाचा प्रशासनातील प्रभावी वापर' या विषयावर आधारित सखोल प्रशिक्षण देण्यात आले, यावेळी आयुक्त शेखर सिंह बोलत होते.

या प्रशिक्षणात महाराष्ट्र ज्ञान महामंडळचे मुख्य महाव्यवस्थापक समीर पांडे व पुणे आणि उत्तर महाराष्ट्र विभागाचे विभागीय व्यवस्थापक विनायक कदम यांनी अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले.

> “ कृत्रिम बुद्धिमत्ता हे भविष्यातील प्रशासनाचे बळ आहे. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांना नव्या तंत्रज्ञानाशी परिचित करण्यात येत आहे. हे कौशल्य भविष्यातील पारदर्शक, गतिमान आणि लोकाभिमुख प्रशासनासाठी उपयोगी ठरेल.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात पार पडलेल्या या प्रशिक्षणादरम्यान मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी निळकंठ पोमण, उप आयुक्त विठ्ठल जोशी, मनोज लोणकर, अण्णा बोदडे, संदीप खोत, सचिन पवार, प्रदीप ठेंगल, उमेश ढाकणे, निलेश बधाणे, सीताराम बहुरे, सहशहर अभियंता अजय सुर्यवंशी, मनोज सेठिया, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी तथा मराठी भाषा समन्वय अधिकारी किरण गायकवाड, सहाय्यक आयुक्त तानाजी नरळे, अविनाश शिंदे, विजयकुमार थोरात, निवेदिता घारगे, अमित पंडित, अजिंक्य येळे, विजयकुमार थोरात, नाना मोरे, क्षेत्रीय अधिकारी किशोर ननवरे, शीतल वाकडे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच कार्यकारी अभियंता आणि विभागप्रमुख उपस्थित होते.

---

# मोशीतील लक्ष्मी चौक ते स्वराज रेसिडेन्सी रस्त्याला 'गती'

## विकास आराखड्यातील 24 मीटर रस्ता होणार : आमदार लांडगे यांचा यशस्वी पाठपुरावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिका विकास आराखड्यातील प्रस्तावित रस्ते ताब्यात घेवून त्याचा विकास करण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घेतला आहे. मोशी येथील लक्ष्मी चौक ते स्वराज रेसिडेन्सी रस्त्याच्या कामाला गती देण्यात आली आहे.

भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांनी शुक्रवारी महापालिका प्रशासनाचे अधिकारी आणि सहकाऱ्यांसोबत मोशी येथे विविध विकासकामांची पाहणी केली. यावेळी सामाजिक कार्यकर्ते निखील बोऱ्हाडे, निलेश बोराटे आणि ग्रामस्थ व सोसायटीधारक उपस्थित होते.



मोशी येथे लक्ष्मी चौक ते स्वराज रेसिडेन्सी येथील गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित रस्त्याचे काम अखेर मार्गी लागले. महानगरपालिका विकास आराखड्यातील या 24 मीटर रस्त्यावर अतिक्रमण होते. सदर अतिक्रमण आणि शिवरस्त्यावरील बेकादेशीर अतिक्रमणही हटवण्यात आले. त्यामुळे जागा ताब्यात घेऊन रस्त्याचे काम सुरू करण्यात येत आहे, तशा सूचना प्रशासनाला दिल्या आहेत. यामुळे या भागातील स्थानिक नागरिक, वाहनचालकांना दिलासा मिळणार आहे.

### ..असा आहे रस्त्याचा फायदा

- » पुणे-नाशिक रोडची परिसराची अंतर्गत 'कनेक्टीव्हीटी'
- » भारतमाता चौक ते चिखली गावठाण रस्त्याला पर्यायी रस्ता
- » रिव्हर सोसायटी, ऐश्वर्यम हमारा, स्वराज, प्रिस्टीन ग्रीन, क्रिस्टल सिटी आदी 30 सोसाट्यांना रस्ता उपलब्ध
- » सुमारे 10 हजार सदनिकाधारकांसाठी सुविधा
- » लक्ष्मी चौकाला जोडणाऱ्या रस्त्यावर वाहतूक कोंडी कमी होणार आहे.

# महापालिकेचे 10 जलतरण तलाव बंद

## जलतरण तलावांची दुरुस्ती तातडीने करून ते कार्यान्वित करण्याच्या क्रीडा विभागाच्या सूचना

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महापालिकेचे ३५ पैकी १० जलतरण तलाव विविध कारणांनी बंद असल्याचे समोर आले आहे. महापालिकेच्या क्रीडा विभागाने केलेल्या पाहणीमध्ये ही बाब स्पष्ट झाली असून, उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर बंद असलेल्या जलतरण तलावांची दुरुस्ती तातडीने करून ते कार्यान्वित करण्याच्या सूचना क्रीडा विभागाने दिल्या आहेत.

शहरातील विविध भागांत नागरिकांच्या सोयीसाठी महापालिकेने ३५ जलतरण तलाव उभारले आहेत. या तलावांमध्ये पोहण्यासाठी आकारण्यात येणारे शुल्क कमी असल्याने उन्हाळ्यात महापालिकेच्या जलतरण तलावांवर मोठी गर्दी होते. सध्या महापालिकेचे २५ तलाव सुरू असून, १० तलाव विविध कारणांनी बंद असल्याचे समोर आले आहे. उन्हाळ्यात हे तलाव बंद राहिल्यास नागरिकांची गैरसोय होऊन महापालिकेच्या उत्पन्नाला देखील मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे हे बंद तलावांच्या तांत्रिक अडचणी, तसेच दुरुस्तीची कामे पूर्ण करून नागरिकांना खुले करण्याच्या सूचना क्रीडा विभागाने दिल्या आहेत.




क्रीडा विभागाच्या उपायुक्त किशोरी शिंदे यांनी शहरातील महापालिकेचे दहा जलतरण तलाव बंद असल्याचे स्पष्ट केले. काही तलावांची निविदा प्रक्रिया पूर्ण झालेली नाही. काही तलावांचे ठेकेदारांनी महापालिकेच्या विरोधात न्यायालयात धाव घेतली आहे, तर काही तलावांचे करारनामे पूर्ण न झाल्याने हे तलाव सध्या बंद आहेत.

> शहरातील दहा जलतरण तलाव विविध कारणांनी बंद आहेत. त्यांपैकी पाच तलाव किरकोळ कामे आणि करारनामे प्रलंबित असल्याने सुरू झालेले नाहीत. या महिन्याच्या अखेरपर्यंत ते सुरू केले जातील. उर्वरित पाच तलाव तांत्रिक कारणांमुळे सुरू करण्यास अडचणी आहेत.
>
> – किशोरी शिंदे, उपायुक्त, क्रीडा विभाग, पुणे महापालिका.

**हे तलाव आहेत बंद** शिवाजीनगर भागातील आमदार शिवाजीराव भोसले जलतरण तलाव, येरवडा येथील केशवराव ढेरे जलतरण तलाव, पाषाण येथील भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम जलतरण तलाव, औंध गाव येथील औंध जलतरण तलाव, हडपसर येथील खासदार विठ्ठलराव तुपे क्रीडा संकुलातील जलतरण तलाव हे दुरुस्तीच्या कामामुळे बंद आहेत. तर, शनिवार पेठेत असलेल्या न. वि. गाडगीळ जलतरण तलावाच्या दुरुस्तीचे काम पूर्ण झाले आहे. मात्र तो अद्याप सुरू झालेला नाही. घोरपडी येथील नारायण तुकाराम कवडे पाटील जलतरण तलाव चालविण्यास देण्यासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे. मात्र त्याचा करारनामा न झाल्याने तो बंद आहे. सहकारनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रीडा संकुलातील जलतरण तलावाची निविदा प्रक्रिया झालेली नाही. बावधन येथील स्वामी विवेकानंद जलतरण तलाव व व्यायामशाळेचे मूल्यांकन झाले नाही. त्यामुळे पुढील प्रक्रिया पार पडलेली नाही. शिवदर्शन येथील जलतरण तलाव व क्रीडा संकुलाच्या संदर्भात न्यायालयीन वाद आणि दुरुस्तीमुळे तो बंद असल्याचे समोर आले आहे.

# कचरा प्रकल्प बंद करण्याच्या आदेशाने महापालिकेची 'कोंडी'

## प्रकल्प बंद करणे अशक्य असल्याचे महापालिका प्रशासनाचे स्पष्टीकरण

**पुणे | प्रतिनिधी**

'सूस येथील घनकचरा प्रकल्प आजच बंद करा; नाही तर या प्रकल्पाविरोधात खुर्ची टाकून बसावे लागेल,' असा इशारा कोथरूडचे आमदार आणि राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी गुरुवारी महापालिका प्रशासनाला दिला. मंत्री पाटील यांनी दिलेल्या आदेशामुळे महापालिका प्रशासनाची कोंडी झाली आहे. मात्र, 'हा प्रकल्प बंद करणे अशक्य असल्याचे स्पष्ट करून प्रत्यक्ष जागेवर जाऊन या प्रकल्पाची पाहणी करून अडचणी समजावून घ्याव्यात,' अशी विनंती महापालिका प्रशासनाने पाटील यांना करण्याचा निर्णय घेतला आहे.



चंद्रकांत पाटील यांच्या निवासस्थानी महापालिकेचे घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त संदीप कदम यांच्याबरोबर बैठक झाली. बैठकीत 'संबंधित प्रकल्पाच्या ठिकाणी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार सुधारणा करण्यात आल्या आहेत. प्रकल्प इतर ठिकाणी हलविण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाकडून देण्यात येणारी जागा महापालिकेच्या ताब्यात आलेली नाही. लवकरच आवश्यक ती कार्यवाही केली जाईल,' असे उत्तर प्रशासनाकडून सांगण्यात आले. त्यावर 'हा प्रकल्प आजच्या आज बंद झाला पाहिजे. नाही तर या प्रकल्पाच्या विरोधात खुर्ची टाकून बसावे लागेल,' असा इशारा मंत्री पाटील यांनी महापालिकेला दिला. तसेच महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क करून चंद्रकांत पाटील यांनी हा प्रकल्प बंद करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे महापालिका प्रशासन अडचणीत सापडले आहे.

> सूस येथील प्रकल्पाचे काम २०४२ पर्यंत देण्यात आले आहे. हा प्रकल्प बंद केल्यास त्यांचे मोठे दायित्व महापालिकेवर पडणार आहे. या प्रकल्पाबाबत काही तक्रारी असतील, तर आवश्यक सुधारणा करण्याची महापालिकेची तयारी आहे. नियमांची पूर्तता करून सुरू केलेला कचरा प्रकल्प बंद केल्यास प्रत्येक भागातून कचरा प्रकल्प बंद करण्यासाठी दबाव येईल. हे शहरासाठी घातक आहे.
>
> - पृथ्वीराज बी. पी., अतिरिक्त आयुक्त, पुणे महापालिका.

'महापालिकेने आवश्यक त्या नियमांची पूर्तता करून हा प्रकल्प उभारला आहे. या प्रकल्पाच्या विरोधात स्थानिक नागरिकांनी न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयाने महापालिकेच्या बाजूने निर्णय देऊन नियमांचे पालन करून प्रकल्प सुरू ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार आवश्यक ती उपाययोजना केली जात आहे,' असे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी यांनी सांगितले.

'हा प्रकल्प तातडीने बंद करणे शक्य नाही. नागरिकांच्या काही तक्रारी असतील, तर महापालिका प्रशासनातील अधिकारी तसेच स्थानिक नागरिक, हे प्रत्यक्ष जागेवर जाऊन मंत्री पाटील यांच्यासमवेत पाहणी करण्यास तयार आहेत. यासाठी वेळ द्यावा,' अशी विनंती पाटील यांना करणार असल्याचे पृथ्वीराज यांनी स्पष्ट केले.

# ठेकेदाराच्या कुचराईकडे अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष

## ना सूचनाफलक ना योग्य मार्गदर्शन, तसेच सुरू आहे रस्त्यांचे डांबरीकरण; धूळ आणि प्रदूषण टाळण्यासाठी नियोजनाचा अभाव

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडमध्ये महापालिकेच्यावतीने रस्ता डांबरीकरणाची कामे हातात घेतली आहेत. काम सुरु असताना योग्य मार्गदर्शन आणि सूचनाफलकांचा अभाव दिसून येत आहे. त्याचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे. धूळ व प्रदूषण टाळण्यात येत असलेले अपयश यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचा सूर उमटल्याचे दिसत आहे. मात्र ठेकेदाराकडून होत असलेल्या कुचराईकडे अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत आहे.



पिंपरी-चिंचवडमध्ये महापालिकेच्यावतीने रस्ता डांबरीकरणाची कामे हातात घेतली आहेत. काम सुरु असताना योग्य मार्गदर्शन आणि सूचनाफलकांचा अभाव दिसून येत आहे. त्याचा त्रास नागरिकांना सहन करावा लागत आहे. धूळ व प्रदूषण टाळण्यात येत असलेले अपयश यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचा सूर उमटल्याचे दिसत आहे. मात्र ठेकेदाराकडून होत असलेल्या कुचराईकडे अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत आहे.

भोसरी विधानसभा मतदारसंघातील विविध प्रभागांमध्ये रस्ता डांबरीकरणाची कामे सुरू आहेत. मोशी, चऱ्होली, चिखली, तळवडे, दिघी भागात ही कामे सुरु आहेत. महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने विकासकामांना येथे प्राधान्य दिल्याचे दिसत आहे. इतर मूलभूत सोयी-सुविधांपेक्षा रस्ता डांबरीकरणाच्या कामाला गती देण्यासाठी महापालिकेचे माजी लोकप्रतिनिधी प्रयत्नशील असल्याचे दिसत आहेत. त्याअनुषंगाने रस्त्याचे डांबरीकरण करण्यात आले की त्याच्या रस्त्याच्या छायाचित्रासोबत आपली छबी प्रसिद्ध करण्यासाठी एकाच प्रभागातील लोकप्रतिनिधींमध्ये जणू स्पर्धाच लागली आहे. मात्र या कामाच्या दर्जाबाबत कोणाला काही पडल्याचे दिसत नाही. महापालिकेच्या नियमानुसार रस्त्यावर डांबरीकरण करताना नेमकी योग्य दर्जाची खडी वापरली आहे का? त्यानंतर त्यावर टाकण्यात आलेले डांबरही त्या दर्जाचे आहे का ? याबाबत कोणीच चौकशी करताना दिसत नाहीत.

तसेच हे काम सुरु असताना काम सुरु आहे त्याबाबत नागरिकांच्या मार्गदर्शनांसाठी कोणतेच मार्गदर्शन , सूचनाफलक लावलेले नाहीत. हे काम नागरिकांसाठीच करण्यात येत असले तरी त्या काळात त्यांची गैरसोय होणार नाही याची खबरदारी संबंधित ठेकेदाराने घेणे आवश्यक असल्याच्या प्रतिक्रिया उमटताना दिसत आहेत. काम सुरू असताना धुळीचा प्रादुर्भाव वाढताना दिसत आहे. रस्त्यांचे काम सुरु असताना या गोष्टींचीही काळजी ठेकेदाराने घेणे आवश्यक आहे. परंतु, बहुतांश ठिकाणी ठेकेदाराकडून या नियमांची पायमल्ली होताना दिसत आहे. याबाबत क क्षेत्रीय कार्यालयाचे स्थापत्य उपअभियंता नरेंद्र जाधव यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तो होऊ शकला नाही. भोसरी विधानसभा मतदारसंघातील विविध प्रभागांमध्ये रस्ता डांबरीकरणाची कामे सुरू आहेत. मोशी, चऱ्होली, चिखली, तळवडे, दिघी भागात ही कामे सुरु आहेत. या कामाच्या दर्जाबाबत कोणाला काही पडल्याचे दिसत नाही. महापालिकेच्या नियमानुसार रस्त्यावर डांबरीकरण करताना नेमकी योग्य दर्जाची खडी वापरली आहे का? त्यानंतर त्यावर टाकण्यात आलेले डांबरही त्या दर्जाचे आहे का ? याबाबत कोणीच चौकशी करताना दिसत नाहीत.

> रस्त्यांची कामे महापालिकेच्या नियमाने होणे आवश्यक आहे. मात्र अधिकारी आणि ठेकेदार यांच्यात संगनमत असल्याने अधिकारी त्यांच्याकडे दुर्लक्ष करीत आहेत. त्यामुळे ठेकेदार आपल्या मनाचे राजे असल्यासारखे वागताना दिसत आहेत. त्यामुळे रस्त्याचा दर्जा सुधारत नाही, जिथे रस्त्याचे काम सुरु आहे तेथे हवा प्रदूषणाबाबत कोणतीच खबरदारी घेतली जात नाही.
>
> - सत्यम पात्रे , वूड्स व्हिला सोसायटी रोड, मोशी

> एकदा रस्त्याचे काम हातात घेतल्यानंतर ते वेळेत पूर्ण केले पाहिजे. हे रस्ते आमच्या सोयी-सुविधेसाठीच होत आहे. रस्त्याचे काम सुरु असताना त्या कामामुळे उडणाऱ्या धुळीपासून स्थानिक नागरिकांना त्रास होत आहे. त्यामुळे ज्या ठिकाणी धुळीमुळे हवा प्रदूषित होत आहे तेथे त्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे.
>
> - पद्मा गायकवाड , चिखली, हरगुडे वस्ती

# रस्त्यांच्या निकृष्ट कामांबाबत चौकशीला मुहूर्त, कनिष्ठ अभियंत्यांची विभागीय चौकशी सुरू

## महापालिकेच्या अभियंत्यांनी शहरातील विविध ठिकाणच्या रस्त्यांची व इतर कामे दर्जाहीन केल्याच्या अहवालावर कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग पुणे (सीओईपी) ने शिक्कामोर्तब केले.

**पिंपरी | प्रतिनिधी**

विविध रस्त्यांच्या कामे निकृष्ट दर्जाची झाली असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर अखेर याबाबतच्या चौकशीला मुहूर्त मिळाला आहे. महापालिकेच्या अभियंत्यांनी शहरातील विविध ठिकाणच्या रस्त्यांची व इतर कामे दर्जाहीन केल्याच्या अहवालावर कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग पुणे (सीओईपी) ने शिक्कामोर्तब केले. त्यानंतर स्थापत्य विभागातील १७ कनिष्ठ अभियंत्यांची विभागीय चौकशी सुरू केल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी दिली.



पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्थापत्य विभागाने दुरुस्ती व देखभाल कामांची निविदा प्रक्रिया सन २०१९-२० मध्ये राबविली. ती सर्व कामे तब्बल ४० टक्केपेक्षा कमी खर्चात पूर्ण करण्यात आली. या कामांसंदर्भात आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्याकडे तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. या कामांत दर्जा राखला नसून, ती कामे दर्जाहीन झाल्याचे तक्रारीत म्हटले होते. त्याची दखल घेऊन सिंह यांनी ती सर्व १७ कामे सीओईपी संस्थेकडून तपासून घेण्याचे आदेश दिले.

त्यानुसार, सीओईपीच्या प्रतिनिधींनी २७ जून ते १२ जुलै २०२३ या कालावधीत प्रत्यक्ष जागेवर जाऊन तपासणी केली. त्याचा अहवाल १९ ऑक्टोबर २०२३ ला महापालिकेच्या दक्षता व गुणनियंत्रण कक्षाकडे सादर केला. त्या कामांचा खर्च संबंधित ठेकेदारांकडून वसूल करण्याचे सांगण्यात आले. आयुक्तांच्या आदेशानुसार ठेकेदारांकडून तो खर्च वसूल करण्यात आला. मात्र, दोषी १७ कनिष्ठ अभियंत्यांवर कोणतीही कारवाई करण्यात आली नव्हती.

### दीड वर्षानंतर कारवाई

» या कामांबाबत महापालिकेने ऑक्टोबर २०२३ मध्ये अहवाल सादर केला होता. त्यानंतर संबंधित ठेकेदारांकडून निकृष्ट कामांचा खर्च वसूल करण्यात आला होता. मात्र, अभियंत्यांवर कोणतीही कारवाई केली नाही. आता तब्बल दीड वर्षानंतर विभागीय चौकशी सुरू करण्यात आली आहे. दरम्यान, या कालावधीत काही अभियंते सेवानिवृत्त झाले आहेत. तर काहींना पदोन्नती देण्यात आली आहे.

### या अभियंत्यांची विभागीय चौकशी सुरू

» वर्षा कदम, अंकुश सईजराव, संदीप खोत, विजय जाधव, अग्गू घेरडे, महेंद्र देवरे, वृषाली पोतदार, अशोक मगर, विकास गोसावी, राजेंद्र इंगळे, संजय खरात, शिवाजी वाडकर, संध्या वाघ, सुनील दांडगे, निखिल फेंडर, राजेंद्र क्षीरसागर, धनंजय गवळी ही विभागीय चौकशी सुरू केलेल्या कनिष्ठ अभियंत्यांची नावे आहेत.

# विमानतळबाधित आक्रमक; एखतपूर-मुंजवडीवासीयांनी शासनाची भूमिका धुडकावली

## भूसंपादन विभागाचे उपजिल्हाधिकारी कल्याण पांढरे यांनी शासनाची भूमिका स्पष्ट केली आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

विमानतळ प्रकल्पाबाबत शासनाने यापूर्वी निर्णय झालेला आहे. प्रकल्पामुळे भूमिहीन होणाऱ्या शेतकऱ्यांशी शासन सहमत आहे, मात्र प्रकल्प आवश्यक असल्याने पूर्ण करावाच लागेल. तुम्ही तुमच्या अडचणी, भूमिका मांडा मात्र त्या गृहित धरून शासनाची भूमिका पार पाडली जाईल. सर्वेक्षण आणि मोजणी प्रसंगी संबंधित शेतकऱ्यांनी स्वतः उपस्थित राहून आपले क्षेत्र किती आहे हे सांगावे. कोणताही अनुचित प्रकार होणार नाही याची प्रत्येकाने काळजी घ्यावी. अशा शब्दात भूसंपादन विभागाचे उपजिल्हाधिकारी कल्याण पांढरे यांनी शासनाची भूमिका स्पष्ट केली आहे.

मात्र शासनाची भूमिका धुडकावत ग्रामस्थांनी विमानतळ प्रकल्पाला विरोध कायम ठेवला आहे

पुरंदर तालुक्यातील वनपुरी, उदाचीवाडी, पारगाव, एखतपूर मुंजवडी, खानवडी या सात गावात शासनाने आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाची घोषणा करून आता प्रकल्पाचा एक एक टप्पा पूर्ण केला जात आहे. मागील आठवड्यात ड्रोन सर्व्हे ची निविदा प्रसिद्ध केल्यानंतर आता ज्या गावातील क्षेत्र संपादित केले जाणार आहे, त्या गावांतील नागरिकांशी चर्चा करून शासनाची भूमिका पटवून दिली जात आहे. त्या अनुषंगाने गुरुवारी (दि. 3) एखतपूर-मुंजवडी गावातील नागरिकांशी भूसंपादन विभागाचे उप जिल्हाधिकारी कल्याण पांढरे यांनी चर्चा केली. गावातील स्थानिक प्रश्नांसाठी ग्रामसभा महत्त्वाच्या मात्र राज्याचा, देशाचा प्रकल्प असेल तर याबाबत शासन स्वतंत्र निर्णय घेते त्यामुळे तुमच्या आजपर्यंतच्या ग्रामसभांच्या ठरावांना महत्व नाही, असे स्पष्ट केले.

यांप्रसंगी पुरंदरच्या प्रांताधिकारी वर्षा लांडगे, भोर उपविभागीय अधिकारी तानाजी बरडे, नायबतहसीलदार संदीप पाटील, भूमी अधीक्षक स्मिता गौड, कृषी अधिकारी सूरज जाधव, माजी जिप सदस्य दत्ता झुरंगे, एखतपूर च्या सरपंच शितल टिळेकर, उपसरपंच विशाल झुरंगे, महादेव टिळेकर, माणिक निंबळकर, संतोष हगवणे, अमोल टिळेकर तसेच गावातील शेतकरी उपस्थित होते.



### ...मग आता का विचारता?

» शासनाने आमच्या गावात आमच्या परवानगी शिवाय विमानतळ प्रकल्प जाहीर केला. त्यातील एकएक टप्पा पूर्ण केला जात आहे. आता थेट भूसंपादन करण्याची प्रक्रिया सुरु होत असताना आम्हाला आजपर्यंत काहीच माहिती दिली गेली नाही. त्यामुळे आम्हाला विश्वासात न घेता गृहीत धरून कामे करीत असताल तर आता आमच्याबरोबर चर्चा करायला का आलात ? असा थेट प्रश्न एखतपूर गावच्या सरपंच शीतल टिळेकर यांनी उपस्थित केला.

### गुंजवणीचे पाणी कशासाठी ?

» ज्या गुंजवणीच्या पाण्यावरून तालुक्यात अनेकवर्षे राजकारण सुरु आहे त्या योजनेचे पाणी शेती का विमानतळासाठी? शेतीसाठी पाणी देण्यात येणार असून त्याच बरोबर उर्वरित पाणी विमानतळ प्रकल्पासाठी देण्यात येणार असल्याचे उपजिल्हाधिकारी पांढरे यांनी सांगितले.

### शासनाची भूमिका

- » शेतकऱ्यांना विश्वासात घेण्यात येईल
- » कोणताही अधिकारी मनमानी करणार नाही
- » जास्तीत जास्त मोबदला देणे
- » जमीन कोणाची जाते त्याची मोजणी आवश्यक असल्याने ड्रोनच्याद्वारे होणार आहे त्याच्या नोटीस सर्वांना देण्यात येणार
- » प्रत्येक व्यक्तीशी संपर्क शक्य नाही. आपण एक कमिटी बनवावी त्या माध्यमातून आपल्याशी चर्चा करण्यात येतील
- » पीक पाणीसाठी एक कॅम्प घेऊन सर्व पिकांची नोंदणी करणार

“ उपसरपंच विशाल झुरंगे यांनी शासनाने शेतकऱ्यांना विश्वसात न घेता एमएडीसीकडून एमआयडीसीकडे परस्पर प्रकल्प वर्ग केला त्यामुळे आम्हाला आमच्या अडचणी मांडता येणार नाहीत. एजंट यांनी शेतकऱ्यांना फसवून कमी दरात व्यवहार केले आणि अधिकाऱ्यांना हाताशी धरून नोंदी केल्या त्यामुळे अशा अधिकाऱ्यांची चौकशी करून कारवाई करणार का ? कलम 32 ग ची नोटीस काढताना शेतकऱ्यांना माहिती देणार का ?

- विशाल झुरंगे, उपसरपंच

# दुधाची तहान ताकावर भागली; नारायणगाव आगारात 20 ऐवजी 10 नवीन लालपरी मंजूर

## पाच दाखल : दीड लाखांच्या उत्पन्नात होणार वाढ – आगार प्रमुख अरगडे

**पिंपरी | प्रतिनिधी**

जुन्नर तालुक्यातील नारायणगाव आगारासाठी नवीन 20 एसटी बसची मागणी करण्यात आलेली असली तरी नवीन 10 एसटी बस देण्यात येणार असल्याने दुधाची तहान ताकावर भागवावी लागणार आहे. नवीन 10 एसटी बस पैकी 5 नवीन एसटी बस नारायणगाव डेपोच्या ताफ्यात दाखल झाल्या आहेत.

नवीन पाच एसटी बस पैकी तीन एसटी बस नारायणगाव-जुन्नर-पुणे-संगमनेर-पुणे-नारायणगाव तर दोन एसटी बस नारायणगाव-पुणे-नाशिक-पुणे-नारायणगाव असा दररोज अडीच हजार किलोमीटरचा प्रवास पूर्ण करून नारायणगाव डेपोस लाखोचे उत्पन्न मिळवून देणार आहे. आणखी नवीन पाच एसटी बस लवकरच मिळणार असून त्याचे मुंबई वाहतुकीसाठी नियोजन करण्यात येणार असल्याचे आगारप्रमुख वसंत अरगडे यांनी नमूद केले.

नारायणगाव बस स्थानकात अर्धे कॉंक्रीटीकरणाचे काम पूर्ण झाले असून उर्वरित काम एप्रिल महिना अखेर पूर्ण होणार आहे. कॉंक्रिटी करणाचे काम पूर्ण झाल्यानंतर नारायणगाव बस स्थानक पूर्ण क्षमतेने वापरात येणार असून कॉंक्रिटीकरणाच्या कामामुळे प्रवाशांनी सहकार्य करावे अशी विनंती आगर प्रमुखांनी केली आहे.

दरम्यान, नारायणगाव बस स्थानकाच्या कॉंक्रेटी करणाच्या दोन्ही बाजूला गटारीचे बांधकाम करण्यात येत असून त्यावर बंदिस्त जाळी बसवावी अशी विनंती प्रवाशांनी केली आहे. गटार बंदिस्त न केल्यास अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची असेल अन्यथा आंदोलन छेडण्यात येईल असे राष्ट्रवादी अजित पवार गटाचे शहराध्यक्ष रोहिदास पवार यांनी स्पष्ट केले आहे.



### तो रस्ता बंद करावा; वाहतूक पोलिसांचे दुर्लक्ष

» नारायणगाव बस स्थानकातून मुख्य बाजारपेठेत जाण्यासाठी रस्ता ठेवण्यात आलेला आहे. परंतु त्या रस्त्यामुळे अनेक दुचाकी व चारचाकी वाहन चालक बस स्थानकाच्या आवारात गाडी पार्किंग करून वाहतुकीस अडथळा निर्माण करीत असतात. याशिवाय बाजारपेठेतील हॉटेल आनंद कॅफे जवळ जुन्नरला जाणाऱ्या अनेक खासगी वाहतूक करणाऱ्या जीप अवैधरीत्या उभ्या राहून बस स्थानकातील प्रवाशांची वाहतूक करून अडचण निर्माण करतात. त्यामुळे बस स्थानकाच्या आवारातून मुख्य बाजारपेठेत जाणारा रस्ता तात्काळ बंद करावा अशी मागणी प्रवाशांकडून केली जात आहे. बस स्थानक परिसरात सुरू असलेल्या अवैध वाहतुकीवर कारवाई करण्यास वाहतूक पोलिसांचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे.